# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 13/07/2023 (गुरूवार) दुपार

---

## दरोडा करण्याची तयारी करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. रामटेक :— अंतर्गत १९ किमी अंतरावर सराखा बोर्डा शिवार येथे दिनांक ११/०७/२०२३ ते दिनांक १२/०७/२०२३ चे २२.३० वा. ते ००.३० वा. दरम्यान सराखा बोर्डा शिवारात एक संशयित ओमनी गाडी व मोटरसायकल उभी आहे. अशा मिळालेल्या गोपनीय माहीती वरुन पोलीस स्टेशन रामटेक येथील स्टाफ रवाना होवून सराखा बोर्ड शिवार येथे अस्मिता ऑर्गनिक फार्मच्या मागे शेत शिवारात जावून पाहणी केली असता काही ईसम एक झुडपाचे मागे लपून बसलेले दिसले त्यांना आवाज दिला असता ते पळून जाण्याचा प्रयत्न करु लागले. त्यांचा पाठलाग केला असता **१) चितामणी हरी मेहर, वय ३५ वर्ष, २) मिथुन हरी मेहर, वय ३२ वर्ष दोन्ही रा. सालई हिवरा बाजार ता. रामटेक ३) प्रणय ललीत दखने, वय २१ वर्ष रा. मामा चेक गोंविदपूर गोंदिया ४) राजकुमार दुर्जन कालसर्पे वय २२ वर्ष, रा. बाजार चौक गोरेगाव जि. गोंदिया** हे मिळून आले व ०२ ते ०३ फरार इसम नामे— १) राहुल राउत, वय अंदाजे २३ वर्ष रा. मुंडिपार गोरेगाव ता. गोरेगाव जि. गोदिया २) अविनाश मरकाम, वय २५ वर्ष रा. सालई हिवरा बाजार ता. रामटेक ३) इंद्रराज उर्फ आय. जी. सलामे अंदाजे वय ४२ वर्ष रा. सालई हिवरा बाजार ता. रामटेक हे इसम अंधाराचा फायदा घेवून तेथून पळून गेले आरोपी क्र. १ ते ४ च्या ताब्यातुन एक गोल्डन रंगाचा व्हिवो कंपनीचा मोबाईल किंमती अंदाजे ७०००/— रु. व त्याचे हातात एक कॅरीबॅग मध्ये लाल रंगाची मिरची पावडर अंदाजे ५०० ग्रॅम किंमती अंदाजे ५०/— रु. ची, एक लाकडी दांडा किंमती अंदाजे २०/— रु. एक निळया रंगाचा रेडमी मोबाईल किंमती अंदाजे ६०००/— रु., एक चाकु किंमती अंदाजे २००/— रु., एक लोखंडी रॉड किंमती अंदाजे ५०/— रु. असे पंचासमक्ष जप्त करण्यात आले. तसेच घटनास्थळावर मिळून आलेले एक ओमणी कार जिचा क्र. एम. एच.—३१/बी.बी.— ५९३९ किंमती अंदाजे १,५०,०००/—रु. होंडा ॲक्टीव्हा मोपेड क्र. एम. एच.—३५/ए.डी.— ४६०७ किंमती अंदाजे ४०,०००/— रु. होंडा शाईन मोटरसायकल क्र. एम. एच. —४०/ बी. वाय. —८१८९ किंमती अंदाजे ५०,०००/—रु. यामाहा सिग्रस झेडआर मोपेड क्र. एम. एच.—४०/बी. क्यू.— १०५६ किंमती अंदाजे ३५,०००/—रु. बजाज डिस्कव्हर मोटरसायकल क्र. एम. एच. —३५/डब्लू— ४००३ किंमती अंदाजे ४०,०००/— रु. हिरो सी. डी. डिलक्स मोटरसायकल क्र. एम. एच.—३१/ सी.यु.—५७८७ किंमती अंदाजे ३५,०००/— रु. असा एकुण ३,६३,३२०/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी नामे— पोलीस नायक अमोल इंगोले ब. नं १८४० पोस्टे रामटेक यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीतांविरुध्द कलम ३९९, ४०२ भादवी सहकलम ४, २५ भाहका कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. १) ते ४) यांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास Psi लांजेवार पोस्टे रामटेक मो. क्र. ९७६४१९०९५१ हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील सुभाष वार्ड येथे दिनांक ०७/०७/२०२३ चे १५.३० वा. ते २२.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— सौ. रत्नमाला रामू दांडेकर, वय ४७ वर्ष, रा. सुभाष वार्ड रामटेक यांच्या घराचा दरवाजा खोलून आत प्रवेश करुन १) दोन सोन्याच्या अंगठया प्रत्येकी ४ ग्रॅम एका अंगठीवर छ व दुसरी अंगठीवर (ॐ) लिहीलेले २) कानातले सोन्याचे झुमके जोड ८.५ ग्रॅम ३) कानातले सोन्याचे वेल जोड़ ४ ग्रॅम ४) एक सोन्याचे बिस्कीट १ ग्रॅम ५) एक सोन्याचे बिस्कीट २५ ग्रॅम असा एकुण किंमती ६०,०००/— रु. तसेच ड्रम मधील गव्हामध्ये ठेवलेले नगदी ५८,५००/—रु. असा एकूण १,१८,५००/—रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरांनी चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक स्वाती यावले मो. नं. ७४४७५९२२६५ या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**